6 NOV 2017 पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# 'शिव-वार्ता : माध्यमांच्या नजरेतून विद्यापीठ'चे प्रकाशन

## विद्यापीठ जनसंपर्क कक्षाचा उपक्रम : वृत्तपत्रीय वार्तांचे संकलन



कोल्हापूर : 'शिव-वार्ता : माध्यमांच्या नजरेतून विद्यापीठ'च्या प्रकाशनप्रसंगी कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे. सोबत डॉ. डी. टी. शिर्के, डॉ. विलास नांदवडेकर, अजित चौगुले, डॉ. जे. एस. बागी आदी. (छाया : एस. अली)

कोल्हापूर / प्रतिनिधी :

शिवाजी विद्यापीठासंदर्भात विविध वृत्तपत्रांमधून प्रकाशित झालेल्या निवडक वार्तांचे संकलन असलेल्या 'शिव-वार्ता : माध्यमांच्या नजरेतून विद्यापीठ' या २०१५-१६ व २०१६-१७ कालावधीतील पुस्तिकांचे प्रकाशन रविवारी करण्यात आले. अशाप्रकारे माध्यमांतून प्रकाशित झालेल्या वृत्तपत्रीय वार्तांचा संग्रह प्रकाशित करण्याचा हा महाराष्ट्रातील विद्यापीठांमधील पहिलाच प्रयोग आहे.

कुलगुरू डॉ. शिंदे म्हणाले, कोल्हापूरमधील वृत्तपत्रे आणि पत्रकार यांची शिवाजी विद्यापीठ तसेच शैक्षणिक क्षेत्राकडे पाहण्याची दृष्टी व्यापक व सकारात्मक आहे याचे प्रत्यंतर या पुस्तिकांच्या पानोपानी येते. विद्यापीठाविषयी प्रत्येक माध्यमकर्मीच्या मनात आपलेपणाची भावना आहे, जी त्यांच्या बोलण्यातून, लिखाणातून जाणवते. विद्यापीठ परिक्षेत्रातील अशा प्रत्येक पत्रकार, संपादक, ब्युरो चीफ, कॅमेरामन, छायाचित्रकार आणि माध्यमांतील सर्व संबंधित घटकांना या पुस्तिका आम्ही समर्पित करत आहोत.

डॉ. देवानंद शिंदे यांनी दि. १८ जून, २०१५ रोजी शिवाजी विद्यापीठाच्या कुलगुरुपदाचा कार्यभार स्वीकारला. जनसंपर्क कक्षाच्या वतीने कुलगुरू डॉ. शिंदे यांच्या कारकीर्दीमध्ये प्रकाशित झालेल्या वृत्तपत्रीय वार्तांचा संक्षिप्त अहवाल या संग्रहाच्या रूपाने सादर केला आहे.

कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे, प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, प्रभारी वित्त व लेखाधिकारी अजित चौगुले, प्रेस क्लबचे अध्यक्ष लुमाकांत नलवडे आणि तंत्रज्ञान अधिविभागाचे संचालक डॉ. जे. एस. बागी यांच्या हस्ते प्रकाशन पुस्तिकांचे करण्यात आले. जनसंपर्क अधिकारी आलोक जत्राटकर, प्रा. श्रीकांत भोसले, हर्षवर्धन पंडित, प्रशांत झंपले आदी उपस्थित होते.

6 NOV 2017

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठ संकलित वृत्तसंग्रहांचे प्रकाशन

## जनसंपर्क कक्षाचा उपक्रम : राज्यात पहिलाच प्रयोग

**सकाळ वृत्तसेवा**

कोल्हापूर, ता. ५ : शिवाजी विद्यापीठाच्या संदर्भात विविध वृत्तपत्रांमधून प्रकाशित झालेल्या निवडक बातम्यांचे संकलन असलेल्या 'शिव-वार्ता: माध्यमांच्या नजरेतून विद्यापीठ' या संदर्भ पुस्तिकेचे प्रकाशन आज विद्यापीठात झाले. २०१५-१६ कालावधीतील संकलित वृत्तांचे हे पुस्तक आहे. विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषद सभागृहात हा कार्यक्रम झाला.

कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे, प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, प्रभारी वित्त व लेखाधिकारी अजित चौगुले, कोल्हापूर प्रेस क्लबचे अध्यक्ष लुमाकांत नलवडे आणि तंत्रज्ञान अधिविभागाचे संचालक डॉ. जे. एस. बागी यांच्या हस्ते हा कार्यक्रम पत्रकारांच्या उपस्थितीत पार पडला. माध्यमांतून प्रकाशित झालेल्या वृत्तपत्रीय वार्तांचा संग्रह प्रकाशित करण्याचा हा महाराष्ट्रातील विद्यापीठांमधील पहिलाच प्रयत्न आहे. या वेळी जनसंपर्क अधिकारी आलोक जत्राटकर, प्रा. श्रीकांत भोसले, हर्षवर्धन पंडित, प्रशांत झंपले आदी उपस्थित होते. या पुस्तिकेच्या संदर्भात बोलताना कुलगुरू डॉ. शिंदे म्हणाले, "कोल्हापूरमधील वृत्तपत्रे आणि पत्रकार यांची शिवाजी विद्यापीठ तसेच शैक्षणिक क्षेत्राकडे पाहण्याची दृष्टी अत्यंत व्यापक व सकारात्मक आहे. याचे प्रत्यंतर या पुस्तिकेच्या पानोपानी येते. शिवाजी विद्यापीठाविषयी प्रत्येक माध्यमाच्या मनात आपलेपणाची भावना आहे, जी त्यांच्या बोलण्यातून, लिखाणातून जाणवते. विद्यापीठ परिक्षेत्रातील अशा प्रत्येक पत्रकार, संपादक, ब्युरो चीफ, कॅमेरामन, छायाचित्रकार आणि माध्यमांतील सर्व संबंधित घटकांना या पुस्तिका आम्ही समर्पित करीत आहोत."



**कोल्हापूर, : विद्यापीठ संकलित वृत्तसंग्रहांचे प्रकाशन रविवारी करताना कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे, प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, प्रभारी वित्त व लेखाधिकारी अजित चौगुले, कोल्हापूर प्रेस क्लबचे अध्यक्ष लुमाकांत नलवडे, तंत्रज्ञान अधिविभागाचे संचालक डॉ. जे. एस. बागी, प्रा. श्रीकांत भोसले, हर्षवर्धन पंडित, प्रशांत झंपले, जनसंपर्कअधिकारी आलोक जत्राटकर आदी.**

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
6 NOV 2017
महाराष्ट्र टाईम्स

# हिमाचलच्या कॉलेजला विद्यापीठाचे मार्गदर्शन

**म. टा. प्रतिनिधी, कोल्हापूर**

केंद्र सरकारच्या तांत्रिक शिक्षण गुणवत्ता सुधारणा कार्यक्रमांतर्गत (टीईक्यूआयपी) शिवाजी विद्यापीठ, तंत्रज्ञान विभागाला उत्तर पूर्व राज्यांसाठी मार्गदर्शक संस्था म्हणून काम करण्याचा मान मिळाला आहे. हिमाचल प्रदेशमधील राजीव गांधी शासकीय अभियांत्रिकी कॉलेजसाठी (आंग्रा) सल्लागार संस्था म्हणून शिवाजी विद्यापीठाची निवड झाली आहे, अशी माहिती कुलगुरु डॉ. देवानंद शिंदे यांनी दिली.

टीईक्यूआयपीच्या तिसऱ्या टप्प्यात मार्गदर्शक संस्था म्हणून विद्यापीठ काम करणार आहे. शैक्षणिक गुणवत्तेसाठी प्रोत्साहन, अभियांत्रिकी शिक्षण प्रणालीवर फोकस, तंत्रज्ञानावर आधारित शिक्षणातील नवकल्पना, परीक्षा प्रणालीची कार्यक्षमता सुधारणे, डेटा व्यवस्थापन आणि उपयोग यासंदर्भात मार्गदर्शकाची भूमिका बजावेल. दरम्यान शिवाजी विद्यापीठातील तंत्रज्ञान विभागाची २००६ मध्ये स्थापना झाली. एआयसीटीई आणि राज्य सरकारच्या डीटीईच्या नियमानुसार प्रवेश प्रक्रिया राबवली जाते. तंत्रज्ञान विभागात बीटेक आणि एमटेकचे अभ्यासक्रम सुरू आहेत. केंद्र सरकारच्या अखत्यारितील मानव संशाधन मंत्रालयाने जागतिक बँकेच्या सहकार्याने अभियांत्रिकी शिक्षणात गुणवत्ता आणि संशोधनासाठी दीर्घकालीन कार्यक्रम राबवत आहे.

कुलगुरू म्हणाले,' टीईक्यूआयपीच्या तिसऱ्या टप्प्यात विद्यापीठाची मार्गदर्शक संस्था म्हणून निवड झाली असून यासाठी सात कोटी रुपये उपलब्ध होणार आहेत. तर हिमाचल प्रदेशमधील संबंधित अभियांत्रिकी कॉलेजला दहा कोटी रुपये मंजूर केले आहेत.'

पत्रकार परिषदेला प्र कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, वित्त व लेखा अधिकारी ए. बी. चौगुले, टीईक्यूआयपी तिसऱ्या टप्प्याचे समन्वयक श्रीकांत भोसले, ॲडव्हान्सड टेक्नॉलॉजी सेंटरचे समन्वयक हर्षवर्धन पंडीत आदी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
6 NOV 2017
पुण्यनगरी

# हिमाचलमधील कॉलेजसाठी शिवाजी विद्यापीठ सल्लागार

## कुलगुरू डॉ. शिंदे यांची माहिती

कोल्हापूर / प्रतिनिधी :

शिवाजी विद्यापीठास २०१३ मध्ये टेक्निकल एज्युकेशन क्वालिटी इम्प्रुव्हमेंट प्रोग्राममध्ये समाविष्ट करण्यात आले होते. याअंतर्गत विद्यापीठातील तंत्रज्ञान विभागास (डीओटी) फेज- २ अर्थात टेक्निकल एज्युकेशन क्वालिटी इम्प्रुव्हमेंट प्रोग्राम (टीईक्यूआयपी) अंतर्गत जागतिक बँकेचा १०.५० कोटी रुपयांचा निधी प्राप्त झाला होता. तिसऱ्या टप्प्यात हिमाचल प्रदेशमधील राजीव गांधी शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, कांग्रा या संस्थेत सल्लागार म्हणून विद्यापीठच्या तंत्रज्ञान विभागाची निवड झाली आहे. या प्रकल्पासाठी संबंधित महाविद्यालयास दहा कोटी, तर विद्यापीठाच्या तंत्रज्ञान विभागास सात कोटींचा निधी मिळणार आहे, अशी माहिती शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी पत्रकार परिषदेत दिली.

कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे म्हणाले, देशातील अभियांत्रिकी संस्था अद्ययावत करण्याकरिता जागतिक बँकेच्या साहाय्याने देशभरात तंत्रज्ञ शिक्षण-१ आणि तंत्रज्ञ शिक्षण-२ प्रकल्पांची यशस्वी अंमलबजावणी झाल्यानंतर जागतिक बँकेच्या मदतीने सरकारने 'टेक्निशियन एजुकेशन तिसरा' नावाचा दुसरा प्रकल्प सुरू केला होता. हा प्रकल्प अंदमान-निकोबार द्वीपसमूह, जम्मू-काश्मीर, मेघालय, मिझोरम, नागालँडमध्ये अभियांत्रिकी शिक्षण विकसित करण्याच्या दिशेने होता.

टीईक्यूआयपी तिसरा तांत्रिक शिक्षण धोरण आणि प्रशासकांची क्षमताखेखील उभारेल. टीईक्यूआयपीच्या पूर्वीच्या टप्प्यात, निवडलेल्या संस्थांच्या चांगल्या कामगिरीचा परिणाम होईल. या कार्यक्रमांतर्गत उत्तर-पूर्व राज्यांसाठी मार्गदर्शक म्हणून करण्यात येणार आहे. पत्रकार परिषदेस प्र. कुलगुरू प्रा. डी. टी. शिर्के, कुलसचिव डॉ. व्ही. डी. नांदवडेकर, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक एम. ए. काकडे, वित्त व लेख अधिकारी ए. बी. चौगुले, तंत्रज्ञान अधिविभागाचे संचालक डॉ. जयदीप बागी तसेच टीईक्यूआयपी फेज ३ चे समन्वयक श्रीकांत भोसले आदी उपस्थित होते.

6 NOV 2017

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# राज्यात पहिले 'अॅडव्हान्सड् टेक्नॉलॉजी सेंटर'

## कुलगुरू डॉ. शिंदे : इंडो जर्मन टूल रूम औरंगाबाद व शिवाजी विद्यापीठ सामंजस्य करारास मूर्त स्वरूप

**सकाळ वृत्तसेवा**

कोल्हापूर, ता. ५ : शिवाजी विद्यापीठात राज्यातील पहिल्या अॅडव्हान्सड् टेक्नॉलॉजी सेंटर - ए सेंटर फॉर ट्रेनिंग, रिसर्च अँड डेव्हलपमेंटची स्थापना केली आहे. या अनुषंगाने डिपार्टमेंट ऑफ टेक्नॉलॉजी, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर व इंडो जर्मन टूल रूम औरंगाबाद यांच्यात झालेल्या करारानुसार ही स्थापना झाल्याची माहिती कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी आज पत्रकार परिषदेत दिली.

पुणे, नागपूर व मुंबई येथे आय.जी.टी.आर.ची तीन उपकेंद्रे आहेत. मात्र, विद्यापीठातील हे केंद्र राज्यातील पहिले आहे. विद्यापीठाकडून सेंटरच्या माध्यमातून कौशल्याधारित प्रशिक्षण, समाजोपयोगी संशोधन व मनुष्यबळ विकास अशा प्रशिक्षण - संशोधन - विकास या तीन घटकांवर भरीव काम करणार असल्याचेही कुलगुरू शिंदे यांनी सांगितले.

स्थानिक उद्योगाच्या समस्या सोडविण्यास 'अॅडव्हान्सड् टेक्नॉलॉजी सेंटर'च्या माध्यमातून विद्यापीठाने पाऊल उचलले आहे. उद्योगांच्या गरजांना समजून 'नीड बेस्ड कोर्सेस' दिले जातील. उद्योजक, प्राध्यापक, तरुणांना भारत सरकारच्या एम.एस.एम.ई. मंत्रालयांतर्गत इंडो जर्मन टूल रूम औरंगाबादच्या साहाय्याने



अप्लाईड कोर्सेसच्या माध्यमातून कौशल्ये प्रदान केली जातील. सरकारच्या 'स्टार्ट अप' प्रकल्पांतर्गत आय.जी.टी.आर. औरंगाबाद येथेही प्रगत संशोधनाची सोय केली जाईल, असेही कुलगुरू शिंदे यांनी सांगितले.

दहावी-बारावी उत्तीर्ण, आय.टी.आय., डिप्लोमा, डिग्रीसह ७२ तासांपासून दीड वर्षाच्या अभ्यासक्रमापर्यंत शिक्षण दिले जाईल. एकूण ३६ अभ्यासक्रम येथे शिकवले जाणार आहेत. हॅन्डस् ऑन ट्रेनिंग विद्यार्थ्यांसाठी महत्त्वाचे असल्याचे डिपार्टमेंट ऑफ टेक्नॉलॉजीचे चालक प्रा. डॉ. जयदीप बागी यांनी सांगितले.

### डिपार्टमेंट टेक्नॉलॉजीचा गौरव...

**टेक्निकल एज्युकेशन क्वालिटी इम्प्रुव्हमेंट प्रोग्राम (टीईक्यूआयपी)च्या दुसऱ्या टप्प्यात जागतिक बँकेचा साडेदहा कोटींचा निधी मिळाला होता. हिमाचल प्रदेशमधील राजीव गांधी शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय कांग्रा या संस्थेस सल्लागार संस्था म्हणून काम करण्याची संधी मिळाली आहे. केंद्र सरकारच्या गुणवत्ता सुधारणा कार्यक्रमात उत्तर-पूर्व राज्यांसाठी मार्गदर्शक म्हणून काम करणार असल्याचेही डॉ. शिंदे यांनी सांगितले.**

प्र-कुलगुरू प्रा. डॉ. डी. टी. शिर्के, कुलसचिव प्रा. डॉ. व्ही. डी. नांदवडेकर, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक श्री. एम. ए. काकडे, वित्त व लेखा अधिकारी ए. बी. चौगुले, टेक्नॉलॉजी सेंटरचे समन्वयक श्री. हर्षवर्धन पंडित आदी परिषदेस उपस्थित होते.

**काय आहे इंडो जर्मन टूल रूम?**

सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योगांच्या वाढ व विकासाला चालना देण्यासाठी भारत सरकारने इंडो जर्मन टूल रूमची स्थापना केली. आय.जी.टी.आर. औरंगाबाद उद्योगांना जागतिक दर्जाचे उत्पादन व सेवा प्रदान करते. इंडो जर्मन टूल रूम, औरंगाबाद आंतरराष्ट्रीय दर्जाची गुणवत्ता साधने, प्रशिक्षित कर्मचारी, तसेच कन्सल्टन्सी देते.

6 NOV 2017
पुढारी
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# अद्ययावत 'टेक्नॉलॉजी सेंटर'ची स्थापना

## उद्योगांच्या सक्षमीकरणासाठी विद्यापीठाचा पुढाकार; तरुणांना थेट रोजगार मिळणारे शिक्षण

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

औरंगाबादचे इंडो जर्मन टूल रूम व शिवाजी विद्यापीठ यांच्यातील सामंजस्य करारास मूर्त स्वरूप आले. या सामंजस्य करारानुसार विद्यापीठात 'रिसर्च अँड डेव्हलपमेंट' ची स्थापना करण्यात आली आहे. या सेंटरच्या माध्यमातून विद्यार्थी व इंडस्ट्रीजमधील कोणत्याही कर्मचाऱ्यांना शिक्षण व प्रशिक्षण देण्याची सुविधा आहे. यामुळे तरुणांना थेट रोजगार मिळणारे शिक्षण उपलब्ध झाले असून इंडस्ट्रीजचा कुशल कामगारांचा शोधही यामुळे संपुष्टात येईल, अशी माहिती शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. (डॉ) देवानंद शिंदे यांनी रविवारी पत्रकार परिषदेत सांगितली. या माध्यमातून अद्ययावत टेक्नॉलॉजी सेंटरची स्थापना करण्यात आली असल्याचे स्पष्ट करण्यात आले.

कुलगुरू डॉ. शिंदे म्हणाले, पश्चिम महाराष्ट्रातील उद्योगांना कुशल मनुष्यबळ उपलब्ध करून देण्याबरोबरच अभियांत्रिकीतील अत्याधुनिक संशोधनाकरिता शिवाजी विद्यापीठाने पुढाकार घेतला आहे. या अनुषंगाने डिपार्टमेंट ऑफ टेक्नॉलॉजी आणि इंडो जर्मन टूल रुम यांच्यात सामंजस्य करार झाला. विद्यापीठाचा संशोधनाचा देशभर दबदबा आहे. त्यामुळेच देशभरातून अठ्ठाविसावे स्थान पटकाविले आहे. तर नुकतेच राष्ट्रीय उच्चस्तर शिक्षा अभियान (रुसा) अंतर्गत ३२ विद्यापीठातील यादीत शिवाजी विद्यापीठाचा समावेश झाला आहे. एकूण ३६ अभ्यासक्रम यासाठी आहेत. दहावी पासपासून विविध शैक्षणिक अर्हता असणाऱ्यांसाठी हे कोर्सेस आहेत. या सेंटरच्या माध्यमातून नव संशोधनाला व उद्योजकतेला प्रोत्साहन मिळणार असल्याचे संचालक प्रा. डॉ. जयदीप बागी यांनी सांगितले. यावेळी प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, कुलसचिव डॉ. व्ही. डी. नांदवडेकर, वित्त व लेखाधिकारी ए. बी. चौगुले, समन्वयक हर्षवर्धन पंडित आदी उपस्थित होते.

दरम्यान, माध्यमांच्या नजरेतून विद्यापीठ या संकल्पनेतून प्रसिद्ध झालेल्या बातम्यांच्या शिव-वार्ता या पुस्तिकेचे सादरीकरण यावेळी करण्यात आले.



शिवाजी विद्यापीठातून

## तंत्रज्ञान अधिविभागाची मार्गदर्शक संस्था म्हणून निवड

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठ तंत्रज्ञान अधिविभागाचा २०१३ साली टेक्निकल एज्युकेशन क्वालिटी इम्प्रूव्हमेंट प्रोग्राममध्ये समाविष्ट करण्यात आला होता. याअंतर्गत विभागाने टेक्निकल एज्युकेशन क्वालिटी इम्प्रूव्हमेंट प्रोग्राम (टीईक्यूआयपी) अनुदान अंतर्गत जागतिक बँकेचा साडेदहा कोटी रुपयांचा निधी प्राप्त केला होता. आता यापुढे टीईक्यूआयपी -३ मधील इन्स्टिट्यूटची मार्गदर्शक संस्था म्हणून अधिविभागाची निवड झाली असून हे विद्यापीठासाठी भूषणावह असल्याची माहिती कुलगुरू प्रा. डॉ. देवानंद शिंदे यांनी रविवारी पत्रकार परिषदेत दिली. कुलगुरू डॉ. शिंदे म्हणाले, या प्रकल्पामुळे विद्यार्थ्यांचा सॉफ्ट कौशल्य विकास आणि औद्योगिक गरजांनुसार राज्य-खासगी क्षेत्रातील सल्लागार गट तयार करण्यात मदत होईल. हिमाचल प्रदेशमधील राजीव गांधी शासकिय अभियांत्रिकी महाविद्यालय, कांग्रा या संस्थेसाठी सल्लागार संस्था म्हणून काम करण्याचे पत्र प्राप्त झाले आहे. केंद्र सरकारच्या तांत्रिक शिक्षण गुणवत्ता सुधारणा कार्यक्रमाचा हा एक भाग आहे. डीओटीचे संचालक डॉ. जयदीप बागी म्हणाले, यासाठी सात कोटी रुपयांचे अनुदान दिले जाणार आहे. शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालयास दहा कोटी रुपयांचा निधी मंजूर झाला आहे. यावेळी प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, कुलसचिव डॉ. व्ही. डी. नांदवडेकर, वित्त व लेखाधिकारी ए. बी. चौगुले, समन्वयक श्रीकांत भोसले आदी उपस्थित होते.

6 NOV 2017
महाराष्ट्र टाईम्स
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठात प्रशिक्षण केंद्र

## ३६ कोर्सेससाठी 'अॅडव्हान्स्ड् टेक्नॉलॉजी सेंटर'ची स्थापना

**म. टा. प्रतिनिधी, कोल्हापूर**

पश्चिम महाराष्ट्रातील उद्योगांना कुशल मनुष्यबळाची उपलब्धता आणि इंजिनीअरिंगमधील अत्याधुनिक संशोधनासाठी शिवाजी विद्यापीठाने पुढाकार घेतला आहे. त्या अनुषंगाने विद्यापीठातील तंत्रज्ञान विभाग आणि इंडो जर्मन टूल रुमबरोबर (औरंगाबाद) सामंज्यस करारानुसार विद्यापीठात 'अॅडव्हान्सड टेक्नॉलॉजी सेंटर ए सेंटर फॉर ट्रेनिंग रिसर्च अँड डेव्हलपमेंट'ची स्थापना करण्यात आली. या सेंटरच्या माध्यमातून विद्यापीठ कौशल्याधातरित प्रशिक्षण, समाजोपयोगी संशोधन आणि मनुष्यबळ विकास या तीन घटकावर भरीव काम करणार असल्याची माहिती कुलगुरु डॉ. देवानंद शिंदे यांनी पत्रकार परिषदेत दिली.

कुलगुरु शिंदे म्हणाले, 'या सेंटरमध्ये विद्यापीठ कार्यक्षेत्रातील व कार्यक्षेत्राबाहेरील विविध अभियांत्रिकी व इतर विद्याशाखेतील विद्यार्थी, प्राध्यापक, उद्योजक, संशोधकांना केंद्र सरकारच्या इंडो जर्मन टूल रुमच्या (औरंगाबाद) सहाय्याने अप्लाइड कोर्सेसच्या माध्यमातून कौशल्ये प्रदान केली जातील. तसेच औरंगाबाद येथेही प्रगत संशोधनाची सोय उपलब्ध करून दिली जाईल. यासाठी नजीकच्या काळात विद्यापीठात तंत्रज्ञान विभागात पदव्युत्तर अभ्यासक्रमांची सुरुवात केली जाईल. प्रशिक्षित कौशल्यपूर्ण मनुष्यबळ उपलब्ध करून पश्चिम महाराष्ट्रातील उद्योगाला विकासाच्या नवीन उंचीवर नेण्याचा प्रयत्न आहे.'

तंत्रज्ञान विभागाचे संचालक प्रा. जयदीप बागी म्हणाले, 'प्रशिक्षण, संशोधन आणि विकास या त्रिसूत्रीचा मिलाफ घडवून कोल्हापूरच्या औद्योगिक वसाहतीसाठी आवश्यक गरजांना नीड बेस्ड कोर्सेस या सेंटरच्या माध्यमातून दिले जातील. येथील कोर्सेस दहावी पास, बारावी पास, आयटीआय, डिप्लोमा आणि पदवीचे शिक्षण घेतलेल्या विद्यार्थ्यांसाठी उपलब्ध असतील. हे कोर्सेस चार दिवस ते दीड वर्षाच्या कालावधीचे आहेत. या सर्व कोर्सेसची माहिती विद्यापीठाच्या वेबसाइटवर उपलब्ध असेल. सेंटरच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमधील उद्योजकतेला आणि नव संशोधनतेला प्रोत्साहन मिळेल.'



### सेंटरमधील उपलब्ध कोर्सेस

विविध इंजिनीअरिंग सॉफ्टवेअरच्या माध्यमातून विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास वाढतील. कौशल्याधारित कोर्सेसमुळे नोकरीच्या संधीत वाढ होईल. महिलांना व्यावसायिक (व्होकेशनल) कौशल्ये विकसित करता येतील. कोल्हापूर परिसरातील उद्योगांना तांत्रिक सल्ला, कुशल मनुष्यबळ उपलब्ध होणार. विद्यार्थ्यांना तांत्रिक ज्ञान, कौशल्य व क्षमतांचा विकास होईल. सेंटरच्या माध्यमातून अॅटोकॅड, कटिया, युनिग्राफिक्स, डेलकॅम, मास्टरकम, स्काडा, टूल डिझाइनच्या कमी कालावधीचे कोर्सेस असतील. याशिवाय मास्टर सर्टिफिकेट कोर्स इन टूल डिझाइन, मास्टर सर्टिफिकेट कोर्स इन कॅड व कॅम आदीसह ३६ कोर्सेसचा समावेश असणार आहे.

### इंडो जर्मन टूल

देशातील उद्योगांच्या विशेषत सूक्ष्म, लघू व मध्यम उद्योगांच्या वाढ व विकासाला चालना देण्यासाठी केंद्र सरकारने इंडो जर्मन टूल रुमची स्थापना केली. केंद्र सरकार, राज्य सरकार आणि जर्मनीच्या संघीय प्रजासत्ताक सरकारचा औरंगाबाद येथील इंडो जर्मन टूल रुम (आयजीटीआर) हा एकत्रित प्रकल्प आहे. आयजीटीआर उद्योगांना जागतिक दर्जा उत्पादन व सेवा प्रदान करते. आंतरराष्ट्रीय दर्जाची गुणवत्ता साधने, प्रशिक्षित कर्मचारी तसेच सल्ला (कन्सल्टन्सी) देते. राज्यात आयजीटीआरची पुणे, नागपूर आणि मुंबई येथे तीन उपकेंद्रे आहेत. राज्यातील चौथे उपकेंद्र शिवाजी विद्यापीठ येथे अॅडव्हान्सड टेक्नॉलॉजी सेंटरच्या माध्यमातून सुरू होत आहे.

6 NOV 2017

लोकमत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शिवाजी विद्यापीठात अ‍ॅडव्हान्स्ड टेक्नॉलॉजी सेंटर

## सामंजस्य करार : स्थानिक उद्योगांसाठी मनुष्यबळ, रोजगार क्षमता वाढविण्यासाठी प्रयत्न

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या डिपार्टमेंट ऑफ टेक्नॉलॉजी आणि इंडो-जर्मन टूल रुम, औरंगाबाद यांच्यामध्ये झालेल्या सामंजस्य करारानुसार विद्यापीठात 'अ‍ॅडव्हान्स्ड टेक्नॉलॉजी सेंटर' - ए सेंटर फॉर ट्रेनिंग, रिसर्च अँड डेव्हलपमेंटची स्थापना करण्यात आली आहे. या सेंटरच्या माध्यमातून कौशल्याधारित प्रशिक्षण, समाजोपयोगी संशोधन आणि मनुष्यबळ विकास अशा तीन घटकांवर काम करणार आहे, अशी माहिती शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. देवानंद शिंदे यांनी पत्रकार परिषदेत दिली.

कुलगुरु डॉ. देवानंद शिंदे म्हणाले, विद्यापीठ स्थानिक उद्योगांच्या समस्या सोडविण्याकरिता तसेच मनुष्यबळाची रोजगार क्षमता वाढविण्यासाठी प्रयत्न करीत आहे. अ‍ॅडव्हान्स्ड टेक्नॉलॉजी सेंटरच्या माध्यमातून शिवाजी विद्यापीठाने महत्त्वाचे पाऊल उचलले आहे. कोल्हापूरमधील औद्योगिक वसाहतींमधील उद्योगांच्या गरजा समजून घेऊन 'नीड बेस्ड कोर्सेस' या सेंटरच्या माध्यमातून दिले जातील. भारत सरकारच्या एम.एस.एम.ई. मंत्रालयांतर्गत इंडो-जर्मन टूल रुम, औरंगाबादच्या साहाय्याने अ‍ॅप्लाईड



कोर्सेसच्या माध्यमातून कौशल्ये प्रदान केली जाणार आहेत.

डिपार्टमेंट ऑफ टेक्नॉलॉजीचे संचालक डॉ. जयदीप बागी म्हणाले, यामध्ये दहावी व बारावी पास उत्तीर्ण, आय.टी.आय. डिप्लोमा, डिग्री, आदी विविध शैक्षणिक अर्हतांधारकांसाठी हे कोर्सेस असणार आहेत. या सेंटरच्या माध्यमातून नवसंशोधनाला तसेच विद्यार्थ्यांमधील उद्योजकतेला प्रोत्साहन मिळणार आहे. हँड्स ऑन ट्रेनिंग विद्यार्थ्यांसाठी महत्त्वाचे आहे.

पत्रकार परिषदेला प्र-कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के, कुलसचिव डॉ. व्ही. डी. नांदवडेकर, वित्त व लेखाधिकारी ए. बी. चौगुले आणि अ‍ॅडव्हान्स्ड टेक्नॉलॉजी सेंटरचे समन्वयक हर्षवर्धन पंडित उपस्थित होते.

### इंडो-जर्मन टूल रुम

देशातील उद्योगांच्या, विशेषत: सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योगांच्या वाढ व विकासाला चालना देण्याकरिता भारत सरकारने इंडो-जर्मन टूल रुमची स्थापना केली. आय.जी.टी.आर., औरंगाबाद उद्योगांना जागतिक दर्जाचे उत्पादन व सेवा प्रदान करते. भारत सरकार, जर्मनीचे संघीय प्रजासत्ताक सरकार व महाराष्ट्र सरकार यांचा एकत्रित प्रकल्प असलेले इंडो-जर्मन टूल रुम, औरंगाबाद आंतरराष्ट्रीय दर्जाची गुणवत्ता साधने, प्रशिक्षित कर्मचारी तसेच कन्सल्टन्सी देते. महाराष्ट्रात पुणे, नागपूर व मुंबई येथे आय.जी.टी.आर.ची तीन उपकेंद्रे असून, महाराष्ट्रातील चौथे उपकेंद्र कोल्हापूर येथे अ‍ॅडव्हान्स्ड टेक्नॉलॉजी सेंटरच्या माध्यमातून शिवाजी विद्यापीठात सुरु झाले आहे.

6 NOV 2017
तरुण भारत
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठाच्या तंत्रज्ञान विभागाला 'टीइक्युआयपी' उपक्रम

प्रतिनिधी
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठातील तंत्रज्ञान विभागाची स्थापना २००३ मध्ये झाली. दिवसेंदिवस प्रगतीचा आलेख वाढत जाऊन, 'टीइक्युआईपी' दोन ऑक्टोबर, २०१६ मध्ये पूर्ण झाला. दोन्ही प्रकल्पांचा तांत्रिक संस्थांमध्ये पायाभूत सुविधा आणि शैक्षणिक मानांकनांवर सकारात्मक परिणाम झाला आहे. त्यामुळे महाराष्ट्रातून तंत्रज्ञान विभागाला टेक्नीकल एज्युकेशन क्वालिटी इम्प्रूव्हमेंट प्रोग्राम (टीइक्युआयपी) उपक्रम देण्यात आला. तसेच या प्रकल्पासाठी व हिमाचल प्रदेशमधील राजीव गांधी शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, कांग्रा संस्थेच्या विकासासाठी १७ कोटींचे अनुदान दिले आहे, अशी माहिती कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी पत्रकार परिषदेत दिली. याप्रसंगी 'शिव–वार्ता: माध्यमांच्या नजरेतून विद्यापीठ' या सन २०१५–१६ व २०१६–१७ कालावधीतील संकलीत पुस्तकांचे प्रकाशन करण्यात आले.

डॉ. शिंदे म्हणाले, 'टीईक्यूआयपी' या उपक्रमांतर्गत विद्यार्थ्यांना तंत्रज्ञान शिक्षणात आणि मानव संसाधन विकासासाठी जागतिक दर्जाचे संशोधन करण्यास व शिकण्याची संधी मिळाली आहे. यामध्ये शैक्षणिक गुणवत्तेस प्रोत्साहन देणे, गुणवत्तापूर्ण संवर्धनासाठी आणि संसाधन वाटणीसाठी संस्थाचे नेटवर्किंग; गुणवत्ता आणि सामाजिक, आर्थिक क्षेत्रात सेवा पोहोचवणे; सिस्टम मॅनेजमेन्ट क्षमता सुधारणा करणे यांचा समावेश आहे. सरकारने दिलेल्या अनुदानापैकी ७ कोटी शिवाजी विद्यापीठाच्या विकासासाठी खर्च केले जाणार आहेत. यावेळी प्र–कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, वित्त व लेखा अधिकारी ए. बी. चौगुले, डिपार्टमेंट ऑफ टेक्नॉलॉजीचे संचालक डॉ. जयदीप बागी उपस्थित होते.

## टीईक्यूआयपीची पार्श्वभूमी

टेक्निकल एज्युकेशन क्वालिटी इम्प्रूव्हमेंट प्रोग्राम (टीईक्यूआयपी) २००३ मध्ये जागतिक बँकेच्या सहाय्यासह तीन टप्प्यांत अमलात आणण्यासाठी दीर्घकालीन कार्यक्रमाच्या रूपाने सुरुवात झाली. याचा पहिला टप्पा २००३ मध्ये सुरू झाला व ३१ मार्च २००९ रोजी संपला. त्यामध्ये १८ केंद्रांद्वारे पुरस्कृत तांत्रिक संस्था, १३ राज्यांतील १२७ संस्था समाविष्ठ होत्या. टीईक्यूआयपी दोनची सुरुवात ऑगस्ट २०१० मध्ये झाली, ज्यामध्ये २३ राज्ये / केंद्रशासित प्रदेश आणि १९१ संस्था (२६ सीएफटीआयसह) समाविष्ट आहेत. टीइक्युआईपी–दोन ऑक्टोबर, २०१६ मध्ये पूर्ण झाला. याचा शैक्षणिक मानांकांवर सकारात्मक परिणाम झाला आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
6 NOV 2017
पुण्यनगरी

# विद्यापीठात अ‍ॅडव्हान्सड् टेक्नॉलॉजी सेंटरची स्थापना

**कोल्हापूर / प्रतिनिधी :**

शिवाजी विद्यापीठाच्या डिपार्टमेंट ऑफ टेक्नॉलॉजी आणि इंडो जर्मन टूल रूम औरंगाबाद यांच्यामध्ये झालेल्या सामंजस्य करारानुसार विद्यापीठात 'अ‍ॅडव्हान्सड् टेक्नॉलॉजी सेंटर'- ए सेंटर फॉर ट्रेनिंग, रिसर्च अँड डेव्हलपमेंटची स्थापना करण्यात आली आहे. या सेंटरच्या माध्यमातून कौशल्याधारित प्रशिक्षण, समाजोपयोगी संशोधन आणि मनुष्यबळ विकास अशा तीन घटकांवर काम करणार आहे, अशी माहिती शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी पत्रकार परिषदेमध्ये दिली.

कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे म्हणाले, विद्यापीठ स्थानिक उद्योगांच्या समस्या सोडविण्याकरिता तसेच मनुष्यबळाची रोजगारक्षमता वाढविण्याकरिता प्रयत्न करत आहे. अ‍ॅडव्हान्सड् टेक्नॉलॉजी सेंटरच्या माध्यमातून शिवाजी विद्यापीठाने महत्त्वाचे पाऊल उचलले आहे. कोल्हापूरमधील औद्योगिक वसाहतींमधील उद्योगांच्या गरजा समजून घेऊन 'नीड बेस्ड कोर्सेस' या सेंटरच्या माध्यमातून दिले जातील. भारत सरकारच्या एमएसएमई मंत्रालयांतर्गत इंडो जर्मन टूल रूम औरंगाबादच्या साहाय्याने अ‍ॅप्लाईड कोर्सेसच्या माध्यमातून डिपार्टमेंट ऑफ टेक्नॉलॉजीचे संचालक डॉ. जयदीप बागी म्हणाले, यामध्ये दहावी, बारावी उत्तीर्ण, आयटीआय डिप्लोमा, डिग्री आदी विविध शैक्षणिक अर्हताधारकांसाठी हे कोर्सेस असणार आहेत. नवसंशोधनाला तसेच विद्यार्थ्यांमधील उद्योजकतेला प्रोत्साहन मिळणार आहे. हॅन्डस् ऑन ट्रेनिंग विद्यार्थ्यांसाठी महत्त्वाचे आहे. पत्रकार परिषदेला प्र. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, कुलसचिव डॉ. व्ही. डी. नांदवडेकर, वित्त व लेखा अधिकारी ए. बी. चौगुले आणि अ‍ॅडव्हान्सड् टेक्नॉलॉजी सेंटरचे समन्वयक हर्षवर्धन पंडित उपस्थित होते.



जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

6 NOV 2017
Times of India

# SUK's tech dept gets TEQIP-III nod

The Shivaji University, Kolhapur's (SUK) Department of Technology (DoT) has been selected in the third phase of the Technical Education Quality Improvement Program (TEQIP) by the Union government.

Under TEQIP-III, the DoT will get an amount of over Rs 7 crore for development and implementation of advanced projects in its academics.

However, the best part of the programme, according to DoT director Jaydip Bagi, is that the department has also been selected for the mentorship programme. Under this, the department will offer mentorship to the institutes in the North-Eastern region of the country, having fewer resources or the expertise.

"We already have been given mentorship responsibility for the Rajiv Gandhi Government Engineering College, Kangra in Himachal Pradesh. A team comprising the experts will be travelling soon to the college. A letter regarding the mentorship has been received from the National Project Implementation Unit (NPIU)," he said.

Devanand Shinde, vice-chancellor of the SUK, said that such responsibility will help in enhancement of soft skills. TNN

जनसंपर्क कक्ष
6 NOV 2017 Times of India शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# One-act play at varsity on Marathi Rangbhumi Din

TIMES NEWS NETWORK

On the occasion of Marathi Rangbhumi Din, the students of the Shivaji University, Kolhapur (SUK) had presented a one-act play — Godown — at the university campus earlier last week. According to university officials, its music and theatre department presents one-act plays every year on the occasion of the Marathi Rangbhumi Din.

According to an SUK official, November 5, 1843 was the date when 'Sita Swayamvar', a musical drama by Vishnudas Bhave, was staged in Sangli. As tribute to Marathi Rangbhumi's achievements, this event was held at the university.

TOI



The SUK's tradition to stage a play on November 5 continued this year as well

**Technology training centre to be set up:** An Advanced Technology Training Centre (ATTC) will be set up at the department of geography at the Shivaji University, Kolhapur (SUK), said university vice-chancellor Devanand Shinde on Sunday. He added that the ATTC is the part of the Shivaji University-Indo-German Tool Room (IGTR).

The institute will act as the fourth sub-centre in the state under the IGTR-Aurangabad, after Pune, Mumbai and Nagpur sub-centres, Shinde said.

CAMPUS BUZZ

The vice-chancellor added that the university had signed a memorandum of understanding (MoU) with IGTR-Aurangabad last year to set up the ATTC.

"At present, we have temporarily set up the ATTC at the university main library's computer section. The full-fledged department of the ATTC will be ready within few weeks," Shinde said.

Jaydip Bagi, director of the department of technology of the SUK, said that the centre will host advanced level software for hands-on training for students.

"The software is such that even private institutes cannot afford them due to their cost. It will be quite beneficial for students, as well as faculty members. Students will also be able to visit the IGTR-Aurangabad under the course training," Bagi said.